आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

२२ ऑक्टोबर २०२४ - मंगळवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- विधानसभा निवडणुकीची अधिसूचना जारी, राज्यात अनेक ठिकाणी उमेदवारी अर्ज भरायला सुरूवात
- विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बंडखोरी आणि पक्षांतराला जोर
- राष्ट्रीय जल पुरस्कार राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते प्रदान, महाराष्ट्राला पाच पुरस्कार
- गडचिरोली जिल्ह्यात काल पोलीस चकमकीत ठार झालेल्यांमध्ये प्रत्येकी १६ लाख रुपयांचं बक्षीस असलेल्या दोन नक्षली म्होरक्यांचा समावेश

  **आणि**
- जागतिक बाजारातल्या परिस्थितीमुळं देशातल्या शेअर बाजारात मोठी घसरण

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकीसाठीची अधिसूचना आज प्रसिद्ध झाली असून राज्यातल्या सर्व २८८ मतदारसंघांमधे एकाच टप्प्यात येत्या २० नोव्हेंबरला मतदान होणार आहे. उमेदवारी अर्ज आजपासून भरता येतील. २९ ऑक्टोबरपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करता येतील. या अर्जांची छाननी ३० ऑक्टोबरला होईल आणि ४ नोव्हेंबरपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येतील. २० नोव्हेंबरला मतदान आणि २३ नोव्हेंबरला मतमोजणी होणार आहे.

नांदेड लोकसभा मतदारसंघातल्या पोटनिवडणुकीची अधिसूचनाही जारी झाली आहे. काँग्रेस खासदार वसंतराव चव्हाण यांच्या निधनामुळे ही जागा रिक्त

झाली आहे. पोटनिवडणुकीसाठीचं मतदानही २० नोव्हेंबरला होणार असून मतमोजणी २३ नोव्हेंबरला होईल.

<><><><><>

विधानसभा निवडणुकीचे उमेदवारी अर्ज दाखल करायला आजपासून सुरुवात झाली. विविध ठिकाणी उमेदवारी अर्ज घेऊन जाण्यासाठी इच्छुकांची गर्दी दिसून आली.

अर्ज दाखल करण्याच्या पहिल्या दिवशी **सातारा** जिल्ह्यात अपक्षांचे ६ अर्ज दाखल झाले. यात फलटण विधानसभा मतदारसंघासाठी दोन, कोरेगाव मतदार संघासाठी दोन, कराड उत्तर एक, सातारा मतदारसंघासाठी एक अर्ज दाखल झाला. **परभणी** विधानसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेसचे अब्दुल पाशा गफार खुरेशी यांनी उमेदवाराने अर्ज दाखल केला आहे. **पाथरी** विधानसभा मतदारसंघात माजी आमदार बाबाजानी दुर्राणी यांनी अपक्ष म्हणून अर्ज दाखल केला असून इतर १८ उमेदवारांनी ५२ अर्ज घेतले आहेत. नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीसाठी जफर अली खान पठाण यांनी अपक्ष म्हणून अर्ज दाखल केला. नाशिकच्या **गंगाखेड** विधानसभा मतदारसंघात आज १७ उमेदवारांनी २७ अर्ज घेतले असले मात्र एकही अर्ज दाखल झालेला नाही.

**नागपूर** जिल्ह्यात निवडणुकीचे अर्ज वितरण आणि भरलेले अर्ज स्वीकारण्यास सुरुवात झाली आहे. **चंद्रपूर** जिल्ह्यातल्या सहा विधानसभा मतदारसंघात आज दिवसभरात इच्छुक उमेदवारांनी २१६ अर्ज घेतले असले तरी एकही अर्ज दाखल झालेला नाही. **धुळे** जिल्ह्यात माध्यम सनियंत्रण समितीने पेड न्यूजवर बारकाईने लक्ष ठेवावं असे आदेश निवडणूक खर्च निरीक्षक रामा नाथन आर यांनी आज धुळ्यात दिले.

आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक  बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

२२ ऑक्टोबर २०२४ - मंगळवार

**<><><><><>**

महाविकास आघाडीत आता अवघ्या काही जागांबाबत सहमती व्हायची आहे, असं काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांनी सांगितलं. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची भेट घेतल्यानंतर ते वार्ताहरांशी बोलत होते.  काँग्रेसची पहिली यादी लवकरच जाहीर होईल, असंही ते म्हणाले.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाची पहिली यादी आज अंतिम होईल, अशी माहिती खासदार अनिल देसाई यांनी दिली. दरम्यान उद्धव ठाकरे यांनी आज रत्नागिरी जिल्ह्यातल्या राजापूर मतदारसंघासाठी एबी फॉर्म दिल्याची माहिती विद्यमान आमदार राजन साळवी यांनी दिली.

**<><><><><>**

भाजपा नेते आणि माजी मंत्री राजकुमार बडोले यांनी आज राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे उपस्थित होते. महायुतीचं जागावाटप लवकरच जाहीर होईल आणि त्याची घोषणा होईल, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

भाजपाचे नवी मुंबई जिल्हाध्यक्ष संदीप नाईक यांनी आज भाजपला सोडचिठ्ठी देत राष्ट्रवादी काँग्रेस शरच्चंद्र पवार पक्षात प्रवेश केला. संदीप नाईक यांचे वडील गणेश नाईक यांना ऐरोली मतदारसंघातून भाजपाने उमेदवारी जाहीर केली आहे. संदीप नाईक बेलापूर मतदारसंघातून निवडणूक लढवण्यास इच्छुक होते. मात्र, भाजपाने त्यांना उमेदवारी नाकारल्याने त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरच्चंद्र पवार पक्षात प्रवेश केल्याचं सांगितलं जात आहे.

**<><><><>**

भाजपचे नेते, माजी खासदार निलेश राणे उद्या शिवसेनेत प्रवेश करणार आहेत. सिंधुदुर्ग जिल्ह्यात कुडाळमध्ये होणाऱ्या जाहीर सभेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत हा पक्ष प्रवेश होईल अशी माहिती निलेश राणे यांनी आज वार्ताहर परिषदेत दिली.

**<><><><>**

राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस अजित यशवंतराव यांनी पक्षाला सोडचिठ्ठी देत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश केला आहे. मुंबईत मातोश्री निवासस्थानी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी त्यांना शिवबंधन बांधलं.

**<><><><>**

भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष केदा आहेर यांना चांदवड-देवळा विधानसभा मतदारसंघात भाजपनं तिकीट नाकारल्यानं देवळा नगरपंचायतीच्या १५ नगरसेवकांनी भाजपच्या प्राथमिक सदस्यपदाचा राजीनामा दिला. मागच्या आठवड्यात डॉक्टर राहुल आहेर यांनी निवडणुकीतून माघार घेतल्याचं जाहीर केलं होतं. परंतु, भाजपनं पहिल्या यादीत डॉ. राहुल आहेर यांनाच तिकीट जाहीर केल्यामुळं केदा आहेर यांचे कार्यकर्ते नाराज झाल्याचं सांगितलं जात आहे.

**<><><><>**

विधानसभा निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांनी २७ स्टार प्रचारकांची यादी जाहीर केली आहे.

या यादीत उपमुख्यमंत्री अजित पवार, खासदार प्रफुल्ल पटेल, खासदार सुनिल तटकरे, मंत्री छगन भुजबळ, सहकारमंत्री दिलीप वळसे पाटील, कृषीमंत्री धनंजय मुंडे, वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ, विधानसभेचे उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ, महिला आणि बालविकास मंत्री अदिती तटकरे, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर, खासदार नितीन पाटील, सयाजी शिंदे, आमदार अमोल मिटकरी यांचा समावेश आहे.

<><><><><>

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात आज ठाणे जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

<><><><><>

सरकारनं सुरू केलेल्या जलजीवन मिशनमुळे ग्रामीण भागात राहणाऱ्यांच्या जीवनात लक्षणीय सुधारणा झाल्याची माहिती राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज दिली. जलशक्ती मंत्रालयातर्फे दिल्या जाणाऱ्या पाचव्या राष्ट्रीय जल पुरस्कारांचं वितरण आज नवी दिल्ली इथं राष्ट्रपतींच्या हस्ते करण्यात आलं. त्यावेळी त्या बोलत होत्या. या पुरस्कारांसाठी सर्वोत्कृष्ट राज्य, जिल्हा, ग्रामपंचायत, शहरी स्थानिक संस्था, शाळा किंवा महाविद्यालय, उद्योग, सर्वोत्कृष्ट पाणी वापरकर्ती संघटना, संस्था आणि नागरी संस्था अशा ९ श्रेणींमध्ये ३८ विजेते निवडण्यात आले. सर्वोत्कृष्ट राज्याच्या गटात ओडिशानं पहिला, उत्तर प्रदेशने दुसरा तर गुजरात आणि पुद्दुचेरीने संयुक्तपणे तिसरा क्रमांक पटकावला. महाराष्ट्रालाही पाच

जलपुरस्कार मिळाले आहेत. यात सर्वोत्कृष्ट शहरी स्थानिक संस्था या श्रेणीत पुणे महानगर पालिकेला पुरस्कार मिळाला आहे. विविध श्रेणीत मिळून महाराष्ट्राला ५ पुरस्कार मिळाले.

<><><><><>

गडचिरोली जिल्ह्यात काल झालेल्या चकमकीत ठार झालेल्यांमध्ये नक्षलवाद्यांच्या २ मोठ्या म्होरक्यांचा समावेश आहे. दोघांवरही प्रत्येकी १६ लाख रुपयांचं बक्षीस होतं. या सर्वांची ओळख पटल्यानंतर पोलिस अधीक्षक नीलोत्पल यांनी आज ही माहिती दिली. जया उर्फ भुरी पदा आणि सावजी उर्फ अंकलू तुलावी हे दोघे कालच्या चकमकीत मारले गेले. हे दोघेही विभागीय समितीचे सदस्य होते. या दोघांशिवाय आणखी तिघे या चकमकीत मारले गेले, त्यांच्यावर प्रत्येकी २ लाख रुपयांचं बक्षीस होतं.

<><><><><>

जागतिक बाजारातल्या परिस्थितीमुळं देशातल्या शेअर बाजारात आज मोठ्या प्रमाणात घसरण दिसून आली. सेन्सेक्स ८० हजारांची पातळी तोडण्याच्या उंबरठ्यावर आहे तर निफ्टी २४ हजार ५०० च्या खाली गेला. दिवसअखेर ९३१ अंकांची घसरण नोंदवून सेन्सेक्स ८० हजार २२१ अंकांवर बंद झाला. निफ्टी ३०९ अंकांनी कोसळून २४ हजार ४७२ अंकांवर बंद झाला.

<><><><><>

लोकमान्य टिळक टर्मिनस-शालिमार एक्स्प्रेसचे दोन डबे नागपूरजवळ रुळावरून घसरले. यात कोणतीही जीवितहानी झाली नाही. अपघातामुळे या

मार्गावरल्या काही गाड्यांचे मार्ग बदलण्यात आले. गाडीचे डबे रेल्वे रुळावर ठेवण्याचं काम सुरू आहे.

<><><><><>

येत्या दोन दिवसांत कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह पावसाची शक्यता असून विदर्भात हवामान कोरडं राहील असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.